ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणें, बुधवार २१ जुलै, १९६५ | अंक १४

## विविध माहिती

**औरंगाबादची भुयारी गटारयोजना**—औरंगाबाद शहरासाठी भुयारी गटार योजना बांधण्याचें ठरलें आहे. ह्या योजनेला आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून ४६ लाख, ८७ हजार रुपयांचें कर्ज मिळणार आहे. योजना पूर्ण करण्यासाठी एकूण ७० लाख रुपयांवर खर्च येईल. आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून औरंगाबाद नगरपालिकेला मिळणाऱ्या कर्जाबद्दल महाराष्ट्र राज्य सरकारनें हमी दिली आहे.

**रेल्वेच्या गतीचा उच्चांक**—पश्चिम जर्मनींतील सरकारी मालकीच्या रेल्वेमार्गावर धांवणाऱ्या एका प्रवासी आगगाडीनें युरोपमधील वेगाचा उच्चांक गांठला आहे. ६० किलोमीटर अंतर असणाऱ्या दोन रेल्वे स्टेशनांच्या मार्गावर ही गाडी कांहीं काळ दर तासाला २२० किलोमीटरपेक्षांहि अधिक वेगानें धांवली. पुढें असणाऱ्या सिग्नलससंबंधीं आगाऊ इषारे देणारें यंत्र एंजिनला बसविलेलें होतें. त्यामुळें ड्रायव्हरचें काम कांहींसें बिनधोक झालें.

**गव्हाचें भरघोस उत्पादन**—पंजाबमधील शेतकऱ्यांनीं गव्हाच्या एकूण उत्पादनांत व दर एकरीं उत्पादनांत नवा उच्चांक गांठला आहे. ह्या वर्षी पंजाबमधील गव्हाचें उत्पादन ६९.८ लाख टनांपर्यंत वाढलें आहे. गेल्या वर्षाच्या मानानें हें उत्पादन २१ टक्के अधिक आहे. दर एकरीं गव्हाच्या उत्पादनांतहि वाढ होऊन तें १३ मणांवरून १५ मणांपर्यंत आलें आहे. वाढलेल्या उत्पादनामुळें पंजाबच्या शेतकऱ्याला ह्या वर्षी ८० कोटी रुपयांचें जादा उत्पन्न मिळेल. गव्हाच्या किमती उतरण्याचा संभव आहे.

**सुएझ कालव्याच्या दरांत वाढ**—सुएझचा कालवा वापरण्याबद्दल घेण्यांत येणाऱ्या पट्टींत वाढ करण्याचें संयुक्त अरब-प्रजासत्ताकानें ठरविलें आहे. वाढ १ टक्क्यानें करण्यांत येईल. मालवाहू बोटींना दर टनामागें सुमारें ८ शिलिंग पट्टी द्यावी लागेल. वाढलेल्या दरामुळें सुएझ कालवा कंपनीला १० लाख इजिप्शिअन पौंडांचें जादा उत्पन्न होईल. दरवाढ केव्हांपासून होणार तें समजलेलें नाहीं.

**रशिआंत आर्थिक सुधारणा**—रशिआंतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांची एक बैठक नुकतीच बोलावण्यांत आली होती. ह्या बठकींत अर्थव्यवस्थेंत सुधारणा करणारे नवे उपाय मंजूर करण्यांत आले. हे उपाय भांडवलशाही पद्धतीचे असून खारकॉव्ह विद्यापीठांतील एक प्राध्यापक मि. लिबरमन ह्यांनीं १९६२ पासून त्यांचा पुरस्कार चालविला आहे. आर्थिक यशासाठी नफ्याच्या प्रेरणेचा उपयोग करण्यांत यावा, असें त्यांनीं सुचविलें आहे.

**न्यूयॉर्कमधील खराब हवा**—न्यूयॉर्कमधील हवा मोटारींपासून निघणाऱ्या धुरामुळें फार खराब झालेली आहे, असें मत सिटी कौन्सिलच्या खास समितीनें व्यक्त केलें आहे. ह्या दूषित हवेमुळें फुप्फुसांच्या रोग्यांची व कॅन्सरच्या रोग्यांची संख्या वाढत चाललेली आहे. आसपासच्या शेतीवर, व रस्त्याकडेला असणाऱ्या झाडझुडपांवरहि ह्या हवेचा अनिष्ट परिणाम होत आहे. झाडेझुडपें वठण्याच्या मार्गावर आहेत.

**१,३०० शास्त्रज्ञांना कायमच्या नोकऱ्या**—परदेशांत शिकून भारतांत येणाऱ्या हिंदी शास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा देशाला फायदा व्हावा म्हणून अशा शास्त्रज्ञांची एक तपशीलवार यादी तयार करण्याचा उपक्रम भारताच्या शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळानें १९५९ सालीं चालू केला होता. ह्या यादींत ३,५४३ शास्त्रज्ञांचीं नांवें दाखल करण्यांत यावयाचीं होतीं. त्यांतील १,४६० शास्त्रज्ञांनींच ह्या सोयीचा फायदा घेण्याचें ठरविलें. बाकीचे शास्त्रज्ञ परदेशांत अभ्यास करीत असून परत आल्यावर यादींत समाविष्ट होतील. गेल्या पांच वर्षांत १,३०० शास्त्रज्ञांना त्यांच्या गुणवत्तेप्रमाणें भारतांत कायमच्या नोकऱ्या देण्यांत आल्या आहेत.

**दुधाच्या तुटवड्याचा परिणाम**—बंगालमध्यें दुधापासून बनविण्यांत येणाऱ्या मिठाईंत रसगुल्ला, राजभोग, संदेश, इत्यादि प्रकार प्रसिद्ध आहेत. त्यांतल्या त्यांत संदेश ह्या मिठाईच्या प्रकाराला विशेष महत्त्व आहे. कारण, बंगाली लोक त्याच्या सेवनाशिवाय, जेवण पुरें झालें असें मानीत नाहींत. बंगालमधील सणांत, व्रतवैकल्यांत, लग्नसमारंभांत संदेशला अग्रस्थान आहे. देवळांतील नैवेद्य तर त्याचाच असतो. परंतु कलकत्त्यामधील दुधाची टंचाई वाढल्यामुळें ह्या मिठाईच्या प्रकाराला बंदी घालावी अशी सूचना राज्याच्या पशुसंवर्धन खात्यानें केली आहे. ह्या शिफारसीचा विचार राज्य सरकार लवकरच करणार आहे.

**अनर्थकारी औषधाचा नवा उपयोग**—गर्भवती स्त्रियांच्या मनांतील प्रक्षोभ आणि अस्वस्थता नाहींशी करण्यासाठी कांहीं वर्षांपूर्वी थालिडोमाइड ह्या औषधाचा उपयोग करण्यांत आला होता. पण, ह्या औषधाच्या सेवनानें विद्रूप मुलें जन्माला येतात असें आढळून आलें होतें. आतां ह्याच औषधाच्या उपयोगानें महारोग बरा करतां येतो असें वृत्त आलें आहे. जेरुसलेम येथील एका चर्मरोगतज्ज्ञानें ह्या औषधाचा उपयोग करून २६ महारोग्यांना बरे केल्याचा दावा सांगितला आहे. आतांपर्यंत थालिडोमाइडचा उपयोग मानसिक अस्वस्थता दूर करण्यासाठीच करण्यांत येत असे.

**पोस्टामधील ठेवींवरील मर्यादा**—पोस्ट ऑफिसांतून ठेवण्यांत येणाऱ्या वैयक्तिक व संयुक्त खात्यांच्या रकमांवर मर्यादा घालण्याचें भारत-सरकारनें पुन्हा ठरविलें आहे. ह्या ठेवींवर मिळणाऱ्या व्याजावर कर आकारण्यांत येत नाहीं. व्यक्तिगत खात्यावर ह्यापुढें २५ हजारांपेक्षा जास्त रक्कम ठेवतां येणार नाहीं. खात्यांतील रकमेवरील मर्यादा १ एप्रिल रोजीं रद्द करण्यांत आल्या होत्या.

**नवा शक्तिशाली ध्वनिक्षेपक**—भारतांत १,००० किलोवॅट शक्तीचा एक मध्यम लहरींचा ध्वनिक्षेपक उभारण्याच्या कामाची पाहणी करण्यासाठी रशिअन तंत्रज्ञांची तुकडी लवकरच भारतांत येणार आहे. ध्वनिक्षेपण केंद्रासाठी लागणारी यंत्र-सामग्रीही रशिया पुरविणार आहे. गेल्या फेब्रुवारींत अमेरिकेनें ध्वनिक्षेपक देण्याची तयारी दाखविली होती. परंतु अमेरिकेच्या अटी भारताला पटल्या नाहींत. नव्या केंद्राची उभारणी रशिआ रुपयांचें चलन घेऊनच करणार आहे.

**छोटया उद्योगधंद्यांना धोका**—राजस्थानमधील अनेक छोटे उद्योगधंदे बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. ह्या धंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा भासू लागला आहे. शिवाय दुसऱ्या राज्यांतील मोठ्या उद्योगधंद्यांनीं त्यांच्याशी चालविलेली स्पर्धाहि तीव्र होत चालली आहे. सायकली व फर्निचर तयार करण्याच्या धंद्यांना विशेष धोका उत्पन्न झाला आहे. छोटया उद्योगधंद्यांच्या व मोठ्या उद्योगधंद्यांच्या कार्यक्षेत्राची मर्यादा आखून दिल्याखेरीज उभयतांची स्पर्धा थांबणार नाहीं. राजस्थान-मधील छोटया उद्योगधंद्यांना १९५४ सालीं मंजूर करण्यांत आलेल्या कच्च्या मालाच्या हिशोबावरच मध्यवर्ती सरकार अजूनहि वांटप करीत आहे. पण अलीकडे परिस्थिति खूपच पालटली आहे.

**खादीच्या उत्पादनाची केंद्रें बंद**—म्हैसूर राज्याच्या खादी बोर्डानें चालविलेली खादीची पांच उत्पादन केंद्रें बोर्डाच्या अध्यक्षांनीं बंद करण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रांना त्यांच्या व्यवहारांत १२ लाख रुपयांची खोट आली असून त्याशिवाय त्यांच्याकडे २२ लाख रुपये कर्जाची बाकी थकलेली आहे. शिवाय केंद्रांच्या कारभारांत बऱ्याच नियमबाह्य बाबी आणि पैशाच्या गैरवापराचे प्रकार आढळून आले आहेत.

**जवानांच्या नातलगांना जमिनी**—१९६२ मध्यें चीननें भारतावर केलेल्या आक्रमणांत बळी पडलेल्या अगर जखमी झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना सरहद्दीनजीकच्या सरकारी मालकीच्या जमिनींपैकी जमिनी देण्याचा निर्णय पंजाब सरकारनें घेतला आहे. त्याशिवाय आणखी ७८९ एकर जमीनहि त्यांना वाटून देण्यांत येणार आहे. ही जमिन लोकांनीं राष्ट्रीय संरक्षण फंडाला देणगी म्हणून दिलेली आहे.

**खाऱ्या पाण्यापासून गोडें पाणी**—समुद्राच्या खाऱ्या पाण्यांतील मिठाचा अंश काढून टाकून तें गोडें बनविणें आर्थिक-दृष्ट्या शक्यतेच्या कोटींत आलें आहे. प्रे. जॉन्सन ह्यांनीं खाऱ्या पाण्यापासून गोडें पाणी बनविण्याचा एक कार्यक्रम पूर्वी सुचविला होता. अमेरिकन शास्त्रज्ञांनीं व तंत्रज्ञांनीं ह्या प्रश्नांत लक्ष घालून ही किमया साध्य केली आहे २२ ते ३० सेंटस अथवा १·५० रुपयांत १,००० गॅलन गोडें पाणी बनवितां येईल असें त्यांचें म्हणणें आहे. अशा प्रकारचा कारखाना अमेरिकेंत दक्षिण कॅलिफोर्निआंत काढण्यांत यावा अशी त्यांची सूचना आहे. ५ वर्षांपूर्वी १,००० गॅलन खाऱ्या पाण्याचें गोडें पाणी करण्यासाठी ५ डॉलर्स अथवा २४ रुपये खर्च येत असे.


Planning is the essence of the day !
Plan and save for your future !
Open a **SAVINGS BANK ACCOUNT WITH**

(Sch. Bank) **The BELGAUM BANK Ltd.** (Estd. 1930)

Regd. Office : Raviwar Peth, Belgaum.
38 branches throughout Mysore, Maharashtra and Goa.

Earn 4% ( four per cent ) interest on your savings !
Your planning for self is a part of the
**NATIONAL SAVINGS**

*BE YOUR OWN PLANNING MASTER !!!*

( Enquire for our New Series of Cumulative Deposits Also )

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

# अर्थ

बुधवार, २१ जुलै, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### खाजगी मांडवलाच्या शेतीच्या कंपन्या

शेतीच्या मालाचें उत्पादन वाढविण्यासाठी खाजगी मालकीच्या शेतकंपन्या स्थापन करण्याच्या प्रश्नाचा नियोजन समिति विचार करीत आहे. राष्ट्रीय विकास मंडळाच्या जमीन सुधारणा अंमलबजावणी कमिटीकडे सध्यां हा प्रश्न विचारासाठी पाठविण्यांत आला आहे. खाजगी भांडवलाच्या शेतीकंपन्या काढण्याची कल्पना भारत सरकारच्या अन्न व शेतीखात्यांत उगम पावलेली आहे. अंमलबजावणी कमिटीची बैठक लवकरच भरणार आहे. तथापि, नियोजन समितीनें कांहीं तात्त्विक सूत्रें तात्पुरतीं म्हणून निश्चित केलीं आहेत. संकल्पित कंपन्यांनीं शेतकऱ्यांकडील जमिनी मिळवूं नयेत; सरकार ज्या पडीक जमिनी त्यांना देईल त्यांचीच लागवड करावी. ह्या कंपन्यांतून जमीन सुधार कॉर्पोरेशन व राज्यसरकार ह्यांनाहि भाग भांडवल घेतां यावें. शिवाय स्थानिक शेतकऱ्यांसाठी कंपन्यांचें भांडवल ठेवण्यांत यावें. भूमिहीन शेतमजुरांना जमीन देण्याचें सरकारचें धोरण आहे. अशा शेतमजुरांच्या पुनर्वसनांत व्यत्यय येईल अशा रीतीनें कंपन्या काढण्यांत येऊं नयेत. कंपन्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित करण्यांत यावें. ह्या कंपन्यांनीं गवती रानें व दूधवाड्या काढाव्या अगर, बीबियाणें पुरविणारीं शेतें करावीं; अगर ज्या मालाची निर्यात करतां येईल अशा मालाचें उत्पादन करावें. सध्यां निरनिराळ्या राज्यांत जमिनीच्या धारणेवर मर्यादा घालणारे कायदे आहेत. त्यांत दुरुस्ती करून नव्या शेती-कंपन्या काढण्यास परवानगी द्यावी किंवा नाहीं हें अखेर राज्य-सरकारांनींच ठरवावयाचें आहे. नियोजन समितीनें सुचविलेल्या ह्या सूत्रांना सरकारच्या अन्न व शेतीखात्यानें मंजुरी दिली आहे. पडीक जमिनी लागवडीस आणण्यासाठी बरेंच भांडवल लागतें. तें घालण्याची ताकद शेतमजुरांत असत नाहीं. हें काम खाजगी भांडवलाच्या कंपन्याच करूं शकतील, असें शेतीखात्याचें म्हणणें आहे. पडीक जमिनींची पाहणी करून तयार करण्यांत आलेल्या अहवालाप्रमाणें भारतांत १० लाख एकर लागवडीयोग्य जमीन पडीत आहे.

### आफ्रिकेंतील देशांना भारताची मदत

पश्चिम युरोप आणि अमेरिका ह्यांच्याशीं तुलना करतां भारत अविकसित देशांत मोडत असला तरी आफ्रिकेंतील नव्यानें स्वतंत्र झालेल्या देशांचे मानानें तो प्रगत गणला जातो. ह्या मागासलेल्या देशांना भारतानें आपल्या परीनें मदत करावी हें ओघानेंच आलें. ह्या वर्षीं भारताकडून मिळणाऱ्या आर्थिक व तांत्रिक सहकार्यांत वाढ होण्याची शक्यता आहे. भारत सरकारनें ईस्ट आफ्रिकन रेल्वेज ह्या संघटनेला १ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ही संघटना केनिआ, युगांडा आणि टान्झानिया मधील रेल्वेमार्ग चालविते. रेल्वेचे डबे व इतर वाघतें साहित्य भारताकडून खरेदी करण्यासाठी ह्या कर्जाचा उपयोग करण्यांत यावयाचा आहे. ट्यूनिशिआला तांत्रिक मदत देण्यासंबंधीं एक करार करण्यांत आला आहे. कराराचा तपशील अद्याप ठरावयाचा आहे. परंतु दरम्यान ट्यूनिशियांत डिझेल तेलावर चालणारें पाणी उपसण्याचें पंप तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी भारतानें तांत्रिक साह्य देऊं केलें आहे. आफ्रिकेंतील मागासलेल्या राष्ट्रांनीं भारताकडून जवळ जवळ एक हजार तंत्रज्ञ गेल्या सहा महिन्यांत मागून घेतले आहेत. हिंदी तंत्रज्ञांची मागणी करणाऱ्यांत नायजेरिया, लिबिया, कुवेत, घाना, इथिओपिया आणि अफगाणिस्तान हे देश आहेत. परदेशांतील आर्थिक व इतर परिस्थिति वेगळी असल्यानें हिंदी तंत्रज्ञांची निवड काळजी-पूर्वक करावी लागते. हें काम करण्यासाठी अर्थखातें, परराष्ट्र-खातें आणि व्यापार खातें ह्यांचा एक एक प्रतिनिधि असलेली कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. परदेशांत काम करतांना कारभारविषयक अडचणी निवारण करण्यासाठी परराष्ट्रखात्या-तर्फे एका संचालकाची नेमणूक करण्यांत आलेली आहे. विकसन-शील देशांत हिंदची प्रतिनिधि मंडळें पाठविण्यासाठी आणि परदेशांत काम करीत असलेल्या तंत्रज्ञांचे पगार देण्यासाठी चालू आर्थिक वर्षात ७० लाख रुपयांची तरतूद मुद्दाम करण्यांत आली आहे. आर्थिक व तांत्रिक सहकार्याची आणखी वाढ करण्याचा भारताचा इरादा आहे.

### दुधाच्या पुरवठ्यालाहि परदेशी चलनाचा तडाखा

कलकत्त्याच्या नागरिकांना होणारा दुधाचा पुरवठा धोक्यांत आला आहे. दूधपुरवठा करणाऱ्या सरकारी गोळवाल्यांना दुधाच्या भुकटीपासून दूध तयार करण्यासाठी दररोज १५० टन भुकटीची आवश्यकता असते. भुकटीपासून ८३ हजार लिटर दूध तयार करून तें कलकत्तानिवासीयांना पुरविलें जातें. गोळवाल्यांच्या चालकांजवळ सध्यां दुधाच्या भुकटीचा जो सांठा आहे तो ऑगस्ट अखेरपर्यंतच पुरेल. तोपर्यंत दुधाची भुकटी आयात केली नाहीं तर कलकत्त्याच्या नागरिकांचा दूधपुरवठा संपुष्टांत येईल. दुधाची भुकटी मुख्यतः अमेरिका, हॉलंड आणि ऑस्ट्रेलिआंतून आयात करण्यांत येतें. भारत सरकारनें दुधाची भुकटी आयात करण्यासाठी परवानगी देऊन जरूर तितकें परदेशीय चलन तावडतोब मोकळें करावें अशी तातडीची मागणी पश्चिम बंगाल सरकारनें भारत सरकारकडे केली आहे. अशा रीतीनें परदेशीय चलनाची टंचाई कलकत्तेकरांच्या दाराशीं येऊन भिडली आहे.

### बर्मामधील इस्पितळांत भेदाभेद नाहीं

इस्पितळांतील पैसे देणारांसाठी वेगळे वॉर्ड्स बंद करण्याचें बर्मा सरकारनें ठरविलें आहे. असे वॉर्ड्स त्या सरकारनें स्वीकारलेल्या लोकशाहीला सोडून आहेत. ह्यापुढें सरकारी इस्पितळांतून सर्वांना एकजात सारखीच वागणूक मिळेल.

### चीनमध्यें परदेशीयांच्या ठेवीवर व्याज नाहीं

परदेशीयांच्या ठेवीवर व्याज देण्याचें बँक ऑफ चायनानें १ जुलैपासून बंद केलें आहे.

## गोगटे सॉल्ट अँड केमिकल्सचा नवा प्रचंड उपक्रम

### सरकारी व जपानी फर्मच्या भागदारींत रासायनिक खताचा कारखाना

बेळगांवचे उद्योगपति, श्री. रावसाहेब गोगटे हे महाराष्ट्र राज्य सरकारच्या भागीदारींत अमोनिअम क्लोराइड खतें व सोढा अॅश ह्यांच्या उत्पादनासाठी एक मोठी कंपनी काढीत आहेत. ही योजना सुमारें ८·५ कोटी रुपयांची आहे, आणि तिच्यांत एका आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या जपानी फर्मचें कॉलॅबोरेशन मिळविण्याचा चालकांचा प्रयत्न यशस्वी होत आहे. ही जपानी फर्म उत्पादनाच्या तांत्रिक भागाचीच केवळ जबाबदारी उचलणार नसून श्री. गोगटे ह्यांच्या कंपनींत ती भांडवल गुंतविणार आहे आणि यंत्रसामग्रीहि पुरविणार आहे. कारखान्याच्या जागेची महाराष्ट्रांत निवड करण्यासाठी जपानी फर्मचे तीन प्रतिनिधि भारतांत नुकतेच येऊन गेले. कंपनीच्या उत्पादनाचा उठाव होण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं; उलट, त्यामुळें आयातीची आवश्यकता कमी होऊन परदेशी हुंडणावळीची बचत होईल. कंपनीच्या भांडवल उभारणीची योजना अद्याप पक्की झालेली नाहीं. तथापि, ३ ते ४ कोटी रुपयांचें शेअर–भांडवल उभारलें जाईल, त्यापैकी २६% राज्य सरकार देईल, २४% जपानी फर्म देईल आणि बाकीचें भांडवल संचालक, त्यांचे मित्र, आर्थिक संस्था आणि सामान्य जनता ह्यांच्याकडून मिळविलें जाईल. १९६६ च्या पहिल्या सहामाहींत शेअर भांडवलाच्या विक्रीची घोषणा होईल अशी अपेक्षा आहे.

### कच्छच्या सरहद्दीवरील रस्त्यांसाठी ३० कोटी रुपये

कच्छच्या सरहद्दीवर पोंचण्यासाठी चांगले रस्ते बांधण्याचे मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ३० कोटी रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. रस्ते बांधण्याच्या कामास तावडतोब प्रारंभ करण्यांत येणार असून ते शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यांत येणार आहेत. अलीकडे पाकिस्ताननें कच्छवर आक्रमण केलें असतां भारताच्या संरक्षक फौजांना तेथें जाणें कठीण गेले. लष्कराला लागणारें साहित्य, अन्न, पाणी ह्या सर्वच वस्तु चांगल्या रस्त्यांच्या अभावीं योग्य वेळीं त्वरेनें पोंचविणें सध्यांच्या वाहतुकीच्या परिस्थितींत एक दिव्यच आहे. उलट, पाकिस्तानच्या आक्रमक फौजेला मात्र पूर्वीच तयार असलेल्या रस्त्यांचा फायदा घेतां आला. ही परिस्थिति धोक्याची असल्यानें कच्छच्या रणांतील महत्त्वाचीं केंद्रें उत्तम प्रकारच्या रस्त्यांनीं जोडण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. गुजरात राज्याचें सार्वजनिक बांधकाम खातें हें काम करणार आहे.

### धनिक, सौंदर्यवती पण एकाकी

सीलोनमध्यें जन्म पावलेली आणि चित्रकारांना मॉडेल म्हणून उपयोगीं पडणारी लावण्यवती निना डायर ही पॅरीसमध्यें वयाच्या ३५ व्या वर्षी निधन पावली. अलीकडे तिला मानसिक अस्वास्थ्याचे झटके येत असत. तिच्या एका मैत्रिणीनें ती हृदयविकारानें मरण पावली असें सांगितलें असलें तरी पॅरिसच्या पोलिसांच्या मतानें झोंपेच्या गोळ्यांच्या अतिरिक्त सेवनामुळें तिचा अंत झाला. ह्या सौंदर्यवतीनें दोन लग्नें केलीं होतीं. तिचा पहिला पति म्हणजे युरोपमधील पोलाद कारखान्यांचा व शस्त्रास्त्रांच्या कारखान्याचा मालक बॅरन फॉन थायसेन; त्याच्याशीं काडीमोड घेतल्यावर तिनें सध्यांच्या आगाखानच्या चुलत्याशीं विवाह केला होता. पण तोहि अयशस्वी झाला. मृत्युसमयीं ती पॅरिसच्या बाहेरील एका विलासी प्रासादांत राहात होती. सोबतीसाठी तिनें दोन काळे चित्ते, ११ कुत्रे व ३ पोपट बाळगले होते.

## दि सारस्वत को. बँक लि.

### मजबुती आणि तरतेपणा राखून किफायतशीर व्यवहार

नेहमींच्या आणि आवश्यक त्या तरतुदी केल्यानंतर दि सारस्वत कोऑपरेटिव्ह बँक लि. ला ३० जून अखेर संपलेल्या वर्षी १,८९, ३०२ रु. नफा झाला. (अजून ऑडिट पुरें व्हावयाचें आहे.) गेल्या वर्षीचा नफा १,६९,७६३ रु. होता.

जून, १९६५ मध्यें बँकेचें अधिकृत भांडवल १० लक्ष रु. चें २५ लक्ष रु. करण्यांत आलें. वसूल भांडवल १०·२२ लक्ष रु. असून रिझर्व्हज् त्यापेक्षा जास्त, म्हणजे १५·५६ लक्ष रु. चे आहेत.

ठेवींत ७% वाढ होऊन एकूण ठेवी ४१४·७४ लक्ष रु. च्या ४४३·६२ लक्ष रु. वर गेल्या. बँकेनें ११४·१५ लक्ष रु. चीं, म्हणजे ठेवींच्या ३३% कर्जें दिलेलीं आहेत. बँकेची तरती जिंदगी (लिक्विड असेट्स) ३१४·८३ लक्ष रु. ची, म्हणजे एकूण ठेवींच्या ७१% आहे. बँकेचें खेळतें भांडवल ४५०·१६ लक्ष रु. चें ४८०·१५ लक्ष रु. वर गेलें आहे.

गतवर्षीप्रमाणेंच करमाफ ७% डिव्हिडंड देण्याची मॅनेजिंग कमिटीनें शिफारस केली आहे.

### पाव बनविण्याचे सार्वजनिक मालकीचे भटारखाने

मध्यवर्ती सरकारनें पाव भाजण्याचे ६ अद्यावत् भटारखाने काढण्याचें ठरविलें आहे. त्यांच्या उभारणीसाठी १·३२ कोटी रुपये खर्च येणार आहे. भटारखान्यांतलि सर्व यंत्रसामग्री स्वयंचलित असेल. त्यांच्या उभारणीसाठी लागणाऱ्या खर्चापैकी २७ लाख रुपये परदेशी चलनाच्या रूपांत लागणार असून त्याची तरतूद ऑस्ट्रेलियानें कोलंबो मदत योजनेप्रमाणें देणगी म्हणून केली आहे. रुपयांत येणारा खर्च भारत सरकार करणार आहे. दिल्ली, महाराष्ट्र, मद्रास, पश्चिम बंगाल, गुजरात आणि केरळ ह्या राज्यांतून हे पावाचे कारखाने काढण्यांत येणार आहेत. भारताच्या ज्या भागांत तांदुळाचें खाणें विशेष आहे त्या भागांतून गव्हाचें पदार्थ लोकप्रिय करण्याचा हेतु ह्या योजनेमागें आहे. पावाचा दर्जा उत्तम राखून त्यांत अन्नसत्त्वें व भुईमुगांतील प्रथिनें ह्यांचें मिश्रण करण्यांत येणार आहे. ४०० ग्रॅमच्या पावाला ४० ते ५० पैसे अशी किंमत ठेवण्यांत येईल. लोकांच्या आहारांत गहूं अगर त्याचे पदार्थ अधिक प्रमाणांत आल्यास तांदळाच्या मागणीला थोडाबहुत आळा बसेल अशी अपेक्षा आहे. जगांतील फार मोठी लोकसंख्या तांदुळ अधिक खाणारी आहे. गरजेच्या मानानें तांदळाचें उत्पादन कमी आहे. भारतांतहि अशीच स्थिति आहे. सर्व पाव कारखान्यांना मिळून दरसाल सुमारें २५ हजार टन गहूं पुरवावा लागेल. अन्नधान्याच्या टंचाईच्या दिवसांत लोकांनीं आपल्या आहाराच्या संवयी बदलाव्या असें सांगण्यांत येतें. परंतु, मूळचा आहार बदलून त्याऐवजीं दुसरा आहार घेण्याची सोय असली तरच आहारि बदलण्याचा प्रयत्न करणें शक्यतेच्या कोटींत येतें. शहरांतून पाव हा आतां समाजाच्या सर्व थरांपर्यंत पोंचलेला आहे. ग्रामीण भागांत मात्र चांगला पाव मिळण्याची व्यवस्था अजूनहि नीटशी नाहीं. ती तशी झाल्यास तेथेंहि पाव आपलें स्थान निर्माण करील ह्यांत शंका नाहीं. पाव करण्याच्या कारखान्याबरोबरच ह्या धंद्यांशीं संलग्न असे इतर धंदे निघूं लागतील असें समजण्यास हरकत नाहीं.

## रुपयाच्या नोटेचें आत्मचरित्र

माझा जन्म नाशिक येथें डिसेंबर, १९१७ मध्यें झाला. माझा पूर्वज मोठा, वाटोळा, चांदीचा रुपया होता; पण त्या नाण्यांत दोन दोष होते. त्यासाठी सरकारला खर्च फार यावयाचा आणि लोकांच्या खिशांत जाऊन तेथेंच मुक्काम ठोकायची त्याला खोड होती. लवकर हिंडण्याफिरण्याचा त्याच्यांत उत्साहच नव्हता. अर्थशास्त्रज्ञांच्या भाषेत सांगावयाचें, म्हणजे त्याला गतिमानताच नव्हती. चालू शतकाच्या प्रारंभींच्या ऐष आरामाच्या काळांत हें खपून गेलें असतें. पण आतां महायुद्ध सुरू होतें. चांदी आणि सोनें ह्यांना भयंकर मागणी होती आणि माझ्या पूर्वजाला परिस्थितीपुढें नमतें घ्यावें लागलें. त्यामुळें मला संधि मिळाली. चांदीच्या रुपयाच्या नाण्याप्रमाणें, माझा सांठा करण्याची कुणालाच इच्छा होत नाहीं; आणि जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मला वितळविण्यास कुणाचीच तयारी नसते.

माझ्या बालपणीं मी खूप लोकप्रिय झालों; मी तीन वर्षांचा होण्याच्या आधींच देशांतील सर्व ठिकाणचे आणि पातळीचे लोक मला ओळखूं लागले;- १९२० च्या सुमारास सेळत्या नोटांची संख्या १३½ कोटींच्या वर गेली. साहजिकच, त्यांतूनच हेवेदावे सुरू झाले आणि मला माझ्या उच्च स्थानावरून पाडून टाकण्याचे प्रयत्न करण्यांत येऊं लागले. अडीच रुपयाची नोट म्हणजे माझा सर्वांत मोठा प्रतिस्पर्धी. आज जरी कुणाला ह्या प्राण्याची आठवणहि नसली, तरी त्यानें प्रथम दर्शनींच गडबड उडवून दिली होती. दशमान पद्धतीशीं त्याचें कांहीं नातें असावें, अशी शंकाहि कित्येकांनीं व्यक्त केली. वास्तविक, त्यावेळेला दशमानपद्धतीचें कुणाला स्वप्नहि पडलेलें नव्हतें. ही नोट आकारानें माझ्यापेक्षा मोठी असूनहि तिचा टिकाव लागूं शकला नाहीं आणि तिला पळ काढावा लागला. त्यामुळें आतां माझ्या प्रगतीला मोकळें क्षेत्र मिळालें. तरीसुद्धां, माझी चलती अल्पकालीन ठरली. मी चार वर्षांची होतें न होतें तोंच मला वनवासांत धाडण्यांत आलें, परंतु पात्रतेचा अखेर विजय झाल्याविना राहात नाहीं; हिल्टन यंग कमिशननें १९२६ सालीं माझी पुनः मानानें प्रतिष्ठापना केली. माझें त्यावेळीं वय ९ वर्षांचें होतें. तथापि सरकारला त्याची अंमलबजावणी करायला खूपच अवधि लागला. पण माझें पदार्पण मात्र मोठ्या थाटामाटांत, ऑर्डिनन्स जाहीर करून, १९४० मध्यें झालें. सुमारें २५ वर्षांच्या अखंड सेवेनंतर मी म्हणूं शकतें कीं, भारतांतील चलनी नोटींत मीच सर्वांत जास्त लोकप्रिय आहें. माझ्यापेक्षां किमतीने भारी नोटा नाहींत असें नाहीं. पण त्यांचें चारित्र्य माझ्याइतकें निष्कलंक नाहीं. हजार रुपयाच्या नोटेला तर धक्के मारून घालवून लावावें लागलें; कारण ती राष्ट्रीय आर्थिक संसाराचा खेळखंडोबा करूं लागली. ती आतां पुनः परत येऊन थेर करूं लागलेली आहे. माझ्या बाबतींत दोषार्ह कांहींच नाहीं. शंभर रुपयाची नोटसुद्धां मधून मधून वाममार्ग पत्करते. ह्या वड्या नोटा, जुन्या रुपयाच्या नाण्यांप्रमाणें घरवशाच नव्हे; तिजोरीवशा असतात. माझें तसें नाहीं. देशांतील सर्व पातळीच्या लोकांना मी हवी असतें; ते माझ्याकडून सेवा करून घेतात.

माझा कायदेशीर दर्जाहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारत सरकारनें काढलेली नोट माझ्यासेरीज दुसरी नाहीं; सरकारी नाण्याचा मला दर्जा आहे. बाकीच्या सर्व नोटा रिझर्व्ह बँक काढीत असते. माझ्या जन्माच्या सर्टिफिकेटावर वेगवेगळ्या फिनॅन्स सेक्रेटरीची सही असते. हे सेक्रेटरी आज असतात तर उद्यां नसतात (गेल्या १५ वर्षांत असे ८ सेक्रेटरी झाले) पण मी मात्र अबाधित आहें.

येथील बहुतेकांना माझा एकच पोषाख माहीत आहे. परंतु कधीं कधीं मला लालभडक पेहराव चढविला जातो. इराणच्या आखाताजवळील प्रदेशांतच मला तो घालतां येतो; भारतांत नाहीं. ह्या पोषाखांत मी जास्त शोभून दिसतें आणि भारतांत तो वापरण्यास मला आवडेलहि पण ह्या बाबतींत मी स्वतंत्र नाहीं.

मी जनतेची इतकी सेवा बजावली असूनहि लोक मला योग्य त्या सौजन्यानें वागवीत नाहींत असें म्हणणें भाग आहे. पैशांच्या छोट्या पाकिटांतहि मी सहज मावूं शकतें, पण लोक माझ्या लहान लहान घड्या घालतात. त्यामुळें ह्या छळाच्या खुणा माझ्या अंगावर कायम राहतात; परिणामीं, माझें आयुष्य कमी झाल्याविना राहात नाहीं. पांच रुपयांच्या आणि १० रुपयांच्या नोटेपेक्षा मात्र मी अधिक नशीबवान आहे. त्यांच्यावर रबर स्टॅम्प मारले जातात. कांहीं प्रचाराचीं वाक्येंहि लिहिलीं जातात. ह्यामुळें त्यांचा चेहरा विद्रूप होतो, पण त्यातरी काय करणार? सुदैवानें, माझी चण बारीक आहे. त्यामुळें अशी विद्रूपता माझ्या नशिबीं येत नाहीं. पण आज मला काळजी वाटते ती माझ्या अवमूल्यनाची, माझ्या जात चाललेल्या प्रतिष्ठेची. लोकांच्याकरितां मी पूर्वीइतकें करूं शकत नाहीं, पण हा प्रश्न सोडविणें माझ्या आवाक्याबाहेरचें आहे.

मी कोण आहें, हें १४ वेगवेगळ्या भाषांतून सांगूं शकतें.

---

**पाण्याच्या टंचाईचा परिणाम**—पुरी जिल्ह्यांत पिण्याच्या पाण्याची अतिशय टंचाई उत्पन्न झाल्यामुळें कांहींशी चमत्कारिक परिस्थिति उद्भवली आहे. आसपासच्या जंगलांतील हत्तींना तहान लागल्यामुळें ते खेड्यांतील तळ्यावर पाणी पिण्यासाठी येतात. हत्तींचे कळपच तृषा भागविण्यासाठी येत असल्यामुळें खेड्यांतील लोक तळ्यावरून पाणी नेण्यास घाबरतात. परिणामीं हत्ती आणि माणूस ह्यांच्यांतील स्पर्धेत माणसालाच पाण्याविना राहण्याची पाळी आली आहे.

**तेलाबाबतची स्वयंपूर्णता**—पेट्रोल आणि रसायनें खात्याचे मंत्री श्री. हुमायून कबीर ह्यांनीं कलकत्ता येथें बोलतांना असें सांगितलें कीं, इंडियन ऑईल कंपनीच्या कामाची व्याप्ती झपाट्यानें वाढत असून कंपनी लवकरच देशांतील सर्वांत मोठी तेल उत्पादन करणारी संघटना होईल. येत्या पांच वर्षांच्या अवधींत भारत तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल. ह्या काळांत तेलाचा खप बराच वाढला तरी चिंतेचें कारण नाहीं.

**धान्यवाहतुकीच्या खर्चांत वाढ**—भारत अमेरिकेकडून अन्नाची व इतर जड मालाची मोठ्या प्रमाणावर आयात करीत आहे. भारताला मालाची वाहतूक करण्यासाठी बोट कंपन्यांना दरसाल १०० कोटी रुपयांचें परदेशीय चलन द्यावें लागतें. आतांपर्यंत ही रक्कम रुपयांत दिली जात होती. परंतु आतां वाहतूक करणाऱ्या अमेरिकन बोटींचें भाडें डॉलर्समध्यें दिलें पाहिजे असा आग्रह धरण्यांत येत आहे. त्यामुळें वाहतुकीच्या खर्चांत आणखी २० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची वाढ होईल.

**रस्त्यावरील वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण**—उत्तर प्रदेश सरकारनें येत्या ५ वर्षांत आणखी ४,०६० मैल मार्गावरील वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें आहे. ही योजना १९७१ मध्यें पूर्ण होईल आणि तसें झाल्यावर उत्तर प्रदेशामधील रस्ता वाहातुकीपैकी १४,००० मैलाच्या मार्गावरील वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण होईल. राष्ट्रीयीकरणाची योजना टप्प्याटप्प्यानें अमलांत आणण्यांत येत आहे.

## विमान वाहतुकीमधील क्रांति

### जेट विमानांमुळें विमानतळांचें बदलतें महत्त्व

कोंकणांतून घाटावर येण्याच्या मार्गातील बोरघाटाच्या तळाशीं खोपोली हें गांव आहे. पूर्वी बैलगाड्यांतून वाहतूक होई, तेव्हां त्या गांवाला महत्त्व होतें. पुढें मुंबई ते खोपोली आणि खंडाळा ते पुणें रेल्वेचे रूळ टाकले गेले, आणि कालांतरानें बोगदे खणून पळसदरीपासून खंडाळ्यापर्यंतचा राहिलेला भागहि रूळांनीं जोडला गेला. त्यामुळें खोपोली बाजूला पडून त्याचें महत्त्व नष्ट झालें. नंतर मोटारी, बसेस व ट्रक्स ह्यांची वाहतूक वाढल्यावर खोपोलीचें नशीब पुनः उदयाला आलें; बस वाहतुकीचें तें जंक्शन बनलें. तेथील हॉटेलांतील गर्दी मोठ्या शहरांतील गर्दीशीं स्पर्धा करूं लागली आहे.

सदर्न रेल्वेवर पुण्यापासून १११ किलोमीटर्स अंतरावर वाठार स्टेशन आहे, त्याची अशीच कहाणी आहे. परंतु ती शोकांतिका आहे. मोटारींचें युग सुरू होण्यापूर्वी पांचगणी–महाबळेश्वरला जाण्यासाठी वाठार स्टेशनवर उतरावें लागे आणि तेथून पुढें टांग्यानें प्रवास करावा लागे. त्यामुळें वाठारला विशेष महत्त्व होतें. स्टेशनवर मांसाहारी लोकांच्यासाठी खाण्यापिण्याची उत्कृष्ट व्यवस्था केलेली होती आणि मेल गाड्याहि तेथें थांबत असत. रेल्वेच्या टाइम टेबलांत अजूनहि वाठारच्या पुढें कंसांत 'पांचगणी आणि महाबळेश्वरसाठी' असें छापलेलें असतें. पुणें स्टेशनावरील नुकत्याच पुनः रंगविलेल्या फलकावर "या ठिकाणीं सदर्न रेल्वेवरून वाठार... बेंगळूर स्टेशनावर जाण्यासाठी गाड्या बदलतात," असें वाक्य आढळतें. हें अवशेष वाठारचें पूर्वीचें महत्त्व दर्शवितात; वास्तविक त्या स्टेशनावर उतरून पांचगणी–महाबळेश्वरला जाणारे प्रवासी आतां फारच थोडे.

गेल्या कांहीं वर्षांत जेट विमानांच्या वाढत्या महत्त्वामुळें, वैमानिक वाहतुकींतहि असाच फरक घडून येत आहे. कांहीं वर्षांपूर्वी जेवढें अंतर जावयास बारा तास लागत त्याला आता सहा तास पुरतात आणि कांहीं वर्षांनीं तीन तासांतहि तेवढें अंतर जातां येईल. जगांतील प्रत्येक प्रमुख शहर आतां विमान वाहतुकीनें इतर प्रमुख शहरांशीं जोडलेलें आहे. दाट वस्तीचीं श्रीमंत शहरेंच एकमेकांशीं विमान वाहतुकीनें जोडलीं जातात. कारण विमानांना उतारू हवेत त्याचप्रमाणें त्या उतारूंना विमानाचें भाडें परवडलें पाहिजे. आतांच्या जेट विमानांना १०,००० फुटांच्या पट्ट्या विमानतळावर उतरण्यासाठी किंवा तेथून उड्डाण करण्यासाठी लागतात; वाहतूक जास्त असेल तर एक पट्टी पुरत नाही. एकेका पट्टीलाच दीड–दोन कोटी रुपये खर्च येतो. जागा, इमारती, इत्यादींचा खर्च वेगळाच. ह्यामुळें विमान वाहतुकीची खऱ्या अर्थानें जंक्शन्स म्हणता येईल, अशा जागा सबंध जगांत फारच थोड्या आहेत. न्यूयॉर्क, शिकॅगो, लॉस-एंजल्स, सॅन फ्रॅन्सिस्को ही अमेरिकेंतील, व्हॅनकुव्हर आणि मॉंट्रिअल हीं कॅनडांतील, लंडन आणि युरोपांतील पॅरिस, ॲम्स्टरडॅम आणि रोम, बैरूट, कैरो, बँकॉक, हॉंगकॉंग, सिडने, होनोलुलू आणि टोकियो ही विमान वाहतुकीचीं प्रमुख केंद्रें आहेत.

न्यूयॉर्क आणि लंडन हीं त्यांतहि विशेष वाहतुकीचीं केंद्रें आहेत; उत्तर ॲटलँटिक महासागराच्या पश्चिमेकडील व पूर्वेकडील व्यापार–उद्योगाचीं प्रमुख शहरें आहेत. बहुतेक सर्व प्रमुख देशांचीं विमानें ह्या शहरांची वाहतूक केल्याखेरीज राहात नाहींत. उत्तर ॲटलँटिक महासागरांत विमानतळांना सोईच्या अशा जागाच नाहींत; ४,५०० मैल पाणीच पाणी आहे; फारच थोडीं, छोटीं छोटीं, तुरळक वस्तीचीं बेटें मध्यें थोडीशीं आहेत. हा दूरचा प्रवास कराव्या लागणाऱ्या विमानांना आवश्यक तसे विमानतळ दोन्ही बाजूंवर निर्माण होणें जरूरच होतें. नवीं नवीं विमानें बनविणारांना हा उत्तर ॲटलँटिकचा विमान मार्गच दृष्टीसमोर ठेवावा लागतो; तेथेंच त्यांचा विशेष वापर होणार.

पूर्वीच्या विमानतळांची योजना शहरांच्या महत्त्वाप्रमाणें विमानांच्या शक्तीच्या मर्यादेनेंहि ठरली जाई. उदाहरणार्थ पिन्स्टन इंजिनांच्या विमानांना पेट्रोल भरून घेण्यासाठी सोय व्हावी, ह्या दृष्टीनें बँकॉकचें महत्त्व वाढलें. पूर्व–पश्चिम वाहतुकीसाठी रंगून हें कलकत्त्याच्या फार जवळ होतें, तर पुढचा, हॉंगकॉंगचा विमानतळ, फार दूर होता. जेट विमानें आल्यावरहि बँकॉकचें महत्त्व टिकून राहिलें आहे, तशी सर्वांची स्थिति नाहीं. पिन्स्टन इंजनांच्या काळांत आयर्लंडमधील शॅनॉन आणि न्यूफौंडलंडमधील गँडर हें विमानतळ अतिशय महत्त्वाचें होतें. तेथें पेट्रोल भरून घेऊन विमानें ॲटलँटिक महासागरावरून उड्डाण करण्यास निघत. आतां जेट विमानें एकदा भरलेल्या पेट्रोलवर ४,००० ते ५,००० मैल जाऊं लागलीं आहेत. त्यामुळें लंडन, पॅरीस, ॲम्स्टरडॅम, ब्रुसेल्स, इत्यादि पूर्वेकडील विमानतळावरून निघून ॲटलँटिक ओलांडणारीं हीं विमानें शॅनॉन आणि गँडर ह्यावरून भुर्र करून निघून जातात. अडचणीच्या वेळीं किंवा प्रतिकूल हवेच्या वेळीं उतरण्यास छोटें विमानतळ अजूनहि उपयोगीं पडतात, पण त्यांचें पूर्वीचें महत्त्व उरलेलें नाहीं. खुद्द लंडनला सुद्धां न उतरतां विमानें पुढें जाऊं लागलीं आहेत, मग बाकीच्यांची काय कथा ? लंडन किंवा युरोपांतील विमानतळावरून निघून हिंदुस्थान, ऑस्ट्रेलियाकडे जाणारीं कित्येक विमानें रोम, अथेन्स, येथें न थांबतां पहिला मुक्काम इस्तंबुल, बैरूट किंवा कैरो येथें करूं लागलीं आहेत.

युरोप आणि अतिपूर्वेकडील देश, त्याचप्रमाणें युरोप आणि पश्चिमेकडील उत्तर अमेरिका ह्यांतील दळणवळणांत उत्तर ध्रुवाकडील मार्गानें वाहतूक सुरू झाल्यापासून क्रांति घडून आली आहे. त्यामुळें अर्ध्या दिवसाची बचत होऊं लागली आहे. त्यामुळें अँकरेज हें जंक्शन उदयास आलें आहे; कांहीं वर्षांपूर्वीपर्यंत त्याचें नांवहि कोणास ठाऊक नव्हतें. त्या कारणानें, पूर्वीच्या रस्त्यावरील कांहीं केंद्रांचा धंदा कमी झाला आहे.

कमी अंतरांची विमानवाहतुकहि वाढत असल्यामुळें, लंडनसारख्या विमानतळावर तर ५३ विमान कंपन्यांचीं विमानें उतारू घेण्यासाठी किंवा उतरवण्यासाठी ये जा करीत असतात. लंडनहून जगांतील १७६ शहरांकडे सरळ विमानानें जाता येतें. पाकिस्तानांत हेलिकॉप्टर्सनें कित्येक शहरें जोडलीं गेलीं आहेत. आफ्रिका, दक्षिण अमेरिका, येथें तर विमान वाहतुकीस खूपच वाव आहे. जेट विमानांमुळें विमान वाहतुकीला नवेनवे मार्ग खुले होत आहेत. समुद्र, वाळवंट, पर्वत, ह्यामुळें हजारों वर्ष वाहतुकीला अडथळा आलेला होता; तो ओलांडायला आतां कांहीं तास, कांहीं मिनिटेंहि पुरतात ! दक्षिण ध्रुवाकडील प्रदेशाशीं संबंध निर्माण होण्याची शक्यता आतां निर्माण झाली आहे. केपटाऊन (दक्षिण आफ्रिका) आणि ख्राइस्टचर्च (न्यूझीलंड) ह्यांच्या दरम्यान चांचणीची ७,००० मैलांची विमान वाहतूक नुकतीच करण्यांत आली आहे. त्यांतून ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका येथें नवे विमानतळ निर्माण होण्याचा रंग दिसत आहे.

**जपानी तज्ज्ञांची भातशेती**—खोपोली येथें दहा एकरांच्या शेतांत जपानी शेतकरी तज्ज्ञ भातशेतीच्या जपानी पद्धतीचा प्रयोग करीत आहेत. त्यांनीं आपल्याबरोबर भातशेतीला उपयोगीं पडणारीं अनेक छोटीं अवजारें आणलीं आहेत. जपानी तज्ज्ञ आपल्या कुटुंबांसह आले असून ते ३ वर्षेपर्यंत जपानी भातशेती करून दाखविणार आहेत. जपानी अवजारें भारतांत तयार करता येण्यासारखीं आहेत. ह्या शेतांत ते भाताचीं दोन पिकें घेणार आहेत.

**केरोसिनची आयात**—इंडिअन ऑईल कॉर्पोरेशन चालू महिन्यांत रशिआकडून १ लाख, १५ हजार टन केरोसिन आणि १ लाख टन डिझेल तेलाची आयात करणार आहे. हा पुरवठा देशाच्या निरनिराळ्या बंदरांतून विभागून देण्यांत येईल. त्याशिवाय मुंबई येथील परदेशी तेलशुद्धीचे कारखानेहि तेलाचा पुरवठा करणार आहेत. अलीकडे कांहीं भागांतून केरोसिन व डिझेल तेलाच्या टंचाईच्या बातम्या आल्या होत्या. त्यामुळें सर्वत्रच केरोसिन व डिझेल तेलाच्या तुटवड्याची भीति वाटूं लागली होती.

**हिंदी दालनाचें यश**—न्यूयॉर्कमध्यें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांतील हिंदी दालन चांगलें यशस्वी झालें आहे. दर आठवड्याला सुमारें नव्वद हजार प्रेक्षक दालनाला भेट देतात आणि तेथील हिंदी वस्तूंची प्रशंसा करतात. दालनाची मांडणी अशा रीतीनें करण्यांत आली आहे कीं, त्यावरून भारताच्या औद्योगिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीची बघणाऱ्याला कल्पना यावी. भारताच्या प्रगतीविषयीं माहिती देणारे लेखहि अमेरिकन वृत्तपत्रांत येत असतात.

**ताजमहालभोंवतीं वृक्षराजी**—ताजमहाल व आग्रा येथील किल्ला ह्यांच्या परिसरांत वृक्षराजी लावून हीं दोन्हीं ठिकाणें अधिक आकर्षक करण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें आंखली आहे. ही योजना पूर्ण होण्यास ७ वर्षांचा अवधि लागेल आणि तीसाठीं २ कोटी रुपये खर्च येईल. ताजमहालाजवळ छोटा बंधारा घालून एक कृत्रिम तळें तयार करण्यांत येणार आहे. ह्या तळ्यांत ताजमहालचें मनोहारी प्रतिबिंब पडेल अशा बेतानें आंखणी करण्यांत येईल.


**राजस्थानांतील डॉक्टरांचा करारभंग**—राजस्थानमधील कॉलेजांत शिकून डॉक्टर्स म्हणून बाहेर पडलेल्यांच्या विरुद्ध कायदेशीर इलाज करण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे. वैद्यकीय कॉलेजांत प्रवेश देण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याकडून करार लिहून घेण्यांत आलेला आहे. शिक्षण संपल्यावर निदान तीन वर्षें तरी राज्य सरकारची नोकरी करण्याची अट करारांत आहे. परंतु बऱ्याच नव्या डॉक्टर्सनीं ही अट पाळलेली नाहीं. सरकारनें अॅडव्होकेटांकडे ह्याबाबत कायदेमंडळांचा सल्ला घेत आहे.

**राज्यकारभारांत हिंदी**—उत्तरप्रदेश, राजस्थान, बिहार आणि मध्यप्रदेश ह्या हिंदीभाषिक राज्यांच्या सरकारांनीं राज्यकारभारांत हिंदीचा वापर करण्याच्या कामीं एकमेकाशीं विचारविनिमय चालू केला आहे. सर्वच राज्यांना कायद्याची परिभाषा ठरविण्याच्या कामीं अडचणी येत आहेत. राज्यकारभारांत शक्यतों सोप्या हिंदी भाषेचा उपयोग करण्याबाबत मात्र सर्वांचें एकमत झालें आहे. परस्परांतील पत्रव्यवहारासाठीहि हिंदीचाच वापर करण्याचें ठरविण्यांत येणार आहे.


ठाकरसी फॅब्रिक्स
-फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड ·SANFORIZED·
रंगदार, रम्य, कमालीचे मोहक
भारी पोत नी टिकाऊ दर्जा हेच त्याचे गमक
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
THACKERSEY FABRICS




BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

**निर्वासितांची वसाहत**—पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांची वसाहत स्थापण्याची एक योजना आंध्र सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे विचारासाठी पाठविली आहे. निर्वासितांना कापडाच्या विणकामांत गुंतविण्याची ही योजना आहे. वसाहतीसाठी ५०० एकर जमीन लागेल. राहण्याची सोय करण्यासाठी २० गाळे असणाऱ्या ५० इमारती बांधण्यांत यावयाच्या आहेत. वसाहतींत १,००० कुटुंबांची सोय करण्यांत येईल.

**परदेशीय चलनावर धाड**—भारत सरकारच्या अर्थखात्याच्या अंमलबजावणी अधिकाऱ्यांनीं मद्रास राज्यांतील तिरुनेलवेली जिल्ह्यांत एका व्यापाऱ्याच्या धंद्याच्या जागीं अचानक छापा घालून ५० हजार रुपये किमतीचें परदेशीय चलन व ५० हजार रुपयांच्या नोटा जप्त केल्या. परदेशी चलनांत ब्रिटिश पौंडांच्या नोटा आणि कॅनडाच्या व अमेरिकेच्या डॉलर्सच्याहि नोटा होत्या. व्यापाऱ्याचें धंद्याचें ठिकाण एका खेड्यांत होतें.

**मिशनरींचीं इस्पितळें ताब्यांत घेतलीं**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें देशांतील सर्व इस्पितळांचें राष्ट्रीयीकरण केलें आहे. ब्रह्मदेशांत परदेशी ख्रिस्ती धर्म प्रसारकांनीं चालविलेलीं ३ मोठीं इस्पितळें असून एक रामकृष्ण मिशननें चालविलेलें आहे. हीं सर्व इस्पितळें आतां नव्या चालकांच्याकडून चालविलीं जातील. रोग्यांकडून पैसे घेणारा इस्पितळांतील विभाग यापुढें बंद करण्यांत येणार आहे.

**कोंबड्यांच्या खाण्यासाठी मक्याची आयात**—कोंबड्यांना खाऊं घालण्यासाठी २ हजार टन मका आयात करण्याचा करार भारत आणि जागतिक अन्न कार्यक्रम संघटना ह्यांच्या दरम्यान करण्यांत आला आहे. आयात केलेल्या मक्याचें भुईमुगाची पेंड, अन्नधान्याचीं फोलकटें, इत्यादींशीं मिश्रण करण्यांत येऊन तें पंजाब, उत्तरप्रदेश, ओरिसा, मद्रास महाराष्ट्र इत्यादि राज्यांना वांटण्यांत येणार आहे. ह्या राज्यांतील मक्याचें पीक खराब हवेमुळें फारसें हातीं लागलेलें नाहीं.

**अश्लील जाहिरातीबद्दल खटला**—बंगलोरमधील एका चित्रगृहाच्या मालकाविरुद्ध शहराच्या पोलिसांनीं अश्लील जाहिरात लावण्याबद्दल खटला भरला आहे. तरुणांचीं मनें भडकविण्यास कारणीभूत होतील अशा प्रकारच्या जाहिराती नष्ट करण्याचा कायदेशीर अधिकार पोलिसांना आहे. ह्या जाहिरातींविरुद्ध बंगलोरचे मेयर, विद्यार्थ्यांचे पालक आणि स्त्रियांच्या कॉलेजमधील कांहीं विद्यार्थीनी ह्यांनीं तक्रार केली होती. बंगलोरमध्यें हा कायदा वापरण्याचा पहिलाच प्रसंग आहे.

**रेल्वे मार्गाचें विद्युतीकरण**—उत्तर रेल्वे मार्गावरील मोगलसराई ते कानपूर ह्या रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण १९६६ च्या मार्च महिन्यापर्यंत पुरें होईल असा अंदाज आहे. विद्युतीकरण पुरें झाल्यावर ह्या मार्गावरील वाहतुकीची सोय खूपच वाढेल. मोगलसराई ते अलाहाबाद मार्गाचें विद्युतीकरण पुरें झालें असून त्यावर विजेवर चालणाऱ्या गाड्या धावूंहि लागल्या आहेत. हें अंतर १४४ किलोमीटर आहे.


**विजेच्या निर्मितीची यंत्रसामग्री**—हरद्वारजवळ राणीपूर येथें उभारण्यांत यावयाच्या वीजनिर्मिती केंद्रासाठी खूप मोठी आणि अद्ययावत् पद्धतीची यंत्रसामग्री बनविण्याचें काम लेनिनग्रॅडमधील कारखान्यांत करण्यांत येत आहे. वाफेवर व पाण्यावर चालणाऱ्या टर्बाइन्स तयार करण्यासाठी रशिआकडे मोठ्या प्रमाणावर मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत. त्यांचे आराखडे तयार करण्याचें काम रशिअन तज्ज्ञांनीं हातीं घेतलें आहे.


श्री. वा. काळे ह्यांचें नवें पुस्तक

**जया अंगीं मोठेंपण**

पृ. सं. ११६ १४ छायाचित्रें | व्हीनस प्रकाशन, पुणें २. | मार्मिक प्रस्तावना (किंमत रु. ३=००

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्






१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हॅंड पंप्स्, हॅंड रहाट इ. इ.

**– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –**
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-७-६५ पासून ठेवीवरील व्याजाचे दरांत खालीलप्रमाणें वाढ झालेली आहे.*

**मुदतीच्या ठेवी**

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शें. | ६=२५ |
| २ वर्षें | ,, | ६=५० |
| ३ वर्षें | ,, | ६=७५ |
| ५ वर्षें | ,, | ७=२५ |
| ७ वर्षें | ,, | ७=५० |
| ९ वर्षें व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खातें:—दि. १-२-६५ पासून ४ टक्के

*तसेंच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याहि शाखेंत अधिक माहिती मिळूं शकेल.

### महाराष्ट्र चेंबर शेतीविकासाकडे लक्ष देणार

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें ६ ऑगस्ट रोजीं महाराष्ट्र शेतकी परिषद बोलाविली आहे. चेंबरचे अध्यक्ष परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारतील. केंद्रीय अन्न व शेतीमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् हे परिषदेचें उद्घाटन करतील. महाराष्ट्राचे अन्न व शेतीमंत्री श्री. पी. के. सावंत हे परिषदेंत भाषण करतील. शहरांतून व्यापार आणि कारखानदारी ह्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजीं आतां शेतीच्या पद्धतशीर वाढीकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे, असें चेंबरचें मत आहे. चेंबरच्या १,२०० सभासदांपैकी सुमारें २५० सभासद स्वतः शेतकरी आहेत किंवा त्यांचा धंदा शेतीवर आधारलेला आहे. शेती हाहि एक धंदा असून त्याची व्यापारी दृष्टीनें वाढ झाली पाहिजे. जमिनींतून नुसतें उत्पन्न काढून न थांबतां त्यावरील प्रक्रिया आणि त्यावर आधारित उद्योगधंदे ह्यांकडे लक्ष देणें जरूर आहे. ह्या संबंधांतील सद्यःस्थिति लक्षांत यावी आणि उपाययोजना सुचवावी, ह्या दृष्टीनें परिषदेच्या कार्याची आखणी करण्यांत आली आहे. महाराष्ट्र अॅग्रिकल्चरल कन्व्हेन्शनच्या अॅड हॉक कमिटीचे चेअरमन श्री. एम्. एल्. आपटे हे आहेत.

---

### लोकरी कापडाच्या निर्यातींत वाढ करणें शक्य

इंडियन वूलन मिल्स फेडरेशनच्या अध्यक्षांनी एक पत्रक काढून भारतांत तयार होणाऱ्या लोकरी कापडाला रशिया आणि अमेरिका ह्या देशांत चांगली बाजारपेठ मिळण्याची शक्यता असल्याचें जाहीर केलें आहे. ते म्हणतात कीं, रशिया व भारत ह्यांच्या दरम्यानचा व्यापार वाढविण्याचें ठरल्यामुळें रशियांत लोकरीच्या कापडाला चांगला वाव मिळेल. रशियाप्रमाणेंच पूर्व युरोपांतील देशांतहि बाजारपेठ मिळणें शक्य आहे. रशियन सरकारनें लोकांना नित्योपयोगी वस्तूंचा अधिक प्रमाणांत पुरवठा करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. त्यामुळें लोकरीच्या कापडाला रशियांत अधिक मागणी येईल. अलीकडे अमेरिकेंतील लोकहि हिंदच्या लोकरीच्या कापडाविषयीं आस्था दाखवूं लागले आहेत. अमेरिकेंत भारताच्या मालाला बाजारपेठ मिळाली तर लक्षावधि मीटर कापड तेथें खपूं शकेल. मात्र तेथील बाजारपेठ मिळविण्यासाठी भारताला जपान व इंग्लंड ह्या देशांशीं स्पर्धा करावी लागेल. हे देश अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर लोकरीचें कापड पुरवितात.

---

### वैकुंठभाई मेहता स्मारक ट्रस्ट

विकेंद्रित आर्थिक संघटनेसाठीं आणि सहकारी क्षेत्रासाठी प्रशिक्षण देऊन माणसें तयार करणें, त्याचप्रमाणें श्री. मेहता ह्यांचें चरित्र प्रसिद्ध करणें, ह्या उद्देशानें वरील ट्रस्टची स्थापना झाली आहे. खादी कमिशनचे चेअरमन, श्री. ढेबर, हे ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. किमान ५ लक्ष रुपये तरी जमविण्याचा संकल्प श्री. ढेबर ह्यांनीं जाहीर केला. प्रा. धनंजयराव गाडगीळ हे ट्रस्टचे उपाध्यक्ष असून श्री. वर्दे हे ट्रस्टीपैकीं एक आहेत.

### जपानकडून परदेशांना मिळणारी मदत

अविकसित देशांना मदत देणाऱ्या प्रगत देशांत जपानचा क्रम बराच खालीं लागतो. मदत देणाऱ्या इतर पुढारलेल्या देशांकडून मिळत असलेलें साह्य सालोसाल वाढत चाललें आहे. जपानची मदत मात्र कमी होत चालली आहे. १९६१ सालीं जपाननें आशिया व आफ्रिकेंतील मागासलेल्या देशांना ३६.९ कोटी डॉलर्सची मदत दिली होती. गेल्या वर्षी हा आकडा २४.५ कोटी डॉलर्सपर्यंत खालीं घसरला. जपानकडून मिळणारी सर्व मदत इटलीपेक्षा जास्त नाहीं. शिवाय, ह्या मदतींत नुकसानभरपाईनिमित्त दिलेला पैसा आणि प्रत्यक्ष भांडवल-गुंतवणूक ह्यांचाहि समावेश आहे. आशिया आणि आफ्रिकेंतील देशांना द्यावयाच्या मदतीबद्दल चर्चा करण्यासाठी आग्नेय आशियांतील देशांनीं चालू वर्षांत एकत्र येऊन विचार करावा अशी सूचना अलीकडे जपाननें केली आहे.

---

### फुकट वैद्यकीय मदतीचा गैरफायदा

कामगार आणि त्यांचें कुटुंबीय ह्यांना मोफत वैद्यकीय उपचाराची सोय भारतांत बऱ्याच ठिकाणीं करण्यांत आलेली आहे. एम्प्लॉईज स्टेट इन्शुअरन्स योजनेंत आतां ३३ लक्ष औद्योगिक कामगारांपैकी ३० लक्ष कामगार समाविष्ट आहेत. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ३०% कामगारांच्या कुटुंबियांना इस्पितळांतील उपचार आणि शुश्रूषा ह्यांचाहि संपूर्ण लाभ मिळूं लागेल. ह्या संदर्भांत, ग्रेटब्रिटनमधील नॅशनल हेल्थ सर्व्हिसच्या दुरुपयोगाची माहिती उद्बोधक होईल. अगदीं किरकोळ कारणासाठीसुद्धां पेशंट इस्पितळांना फोन करून अॅम्ब्युलन्स गाडी मागवतात, असें तेथें आढळून आलें आहे. असा दुरुपयोग करणारांत स्त्रियांचा भरणा जास्त आहे. फुकटांत विश्रांति आणि न्याहारी मिळविण्यासाठीच सामान्य पेशंटचा प्रयत्न असतो, असें माहितगार सांगतात.

---

### यूनिट आतां वर्ग करतां येणार

यूनिट ट्रस्टच्या यूनिटधारकांना आपलें यूनिट दुसऱ्याला वर्ग करतां येतील. त्यासाठीं ठराविक नमुन्याचा कागद वापरावा लागेल. हे फॉर्म ट्रस्टकडे आणि प्रमुख बँकांकडे मिळूं शकतील. १०० रु. ला ७५ पैसे ह्या दरानें स्टँप लावावा लागेल. यूनिटधारकाकडून ट्रस्टनें यूनिट परत विकत घेण्याची व्यवस्था पहिल्यापासून आहेच.

---

**बिहारमधील साखरेचें उत्पादन**—बिहारमधील साखर कारखान्यांनीं गेल्या हंगामांत म्हणजे नोव्हेंबर ६४ ते ६५ एप्रिल-अखेरपर्यंत ३.९१ लाख टन साखरेचें उत्पादन केलें. राज्यांतील २९ कारखान्यांनीं मिळून ४१.४२ लाख टन ऊंस गाळला. गेल्या वर्षी २८ कारखान्यांनीं मिळून २३.७५ लाख टन ऊंस गाळला होता आणि २.३३ लाख टन साखर पैदा केली होती. बिहारमधील गुळाच्या उत्पादनांत मात्र घट झाली आहे. कारण साखर कारखान्यांनीं अधिक ऊंस विकत घेतला.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**खताच्या कारखान्याला मंजुरी**—इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज, इंडिया, ह्या कंपनीनें कानपूरजवळ एक खताचा कारखाना काढण्याची तयारी दाखविली असून भारत सरकारनें त्याला तात्त्विक मंजुरी दिली आहे. ह्या कंपनीची एक उपकंपनी कारखाना काढण्याची व्यवस्था करील आणि त्यासाठीं ३५ कोटी रुपयांच्या भांडवलाचीहि व्यवस्था करील. कारखान्याच्या उभारणीसाठी लागणारी परदेशीय चलनांतील रक्कम जमविण्याच्या कामीं परदेशी बँकांच्या एका गटानें पुढाकार घेतला आहे. कारखान्यांत प्रथम दरसाल २५ हजार टन नत्रयुक्त खतें निर्माण करण्यांत येतील. नंतर त्याची उत्पादनक्षमता वाढविण्यांत येईल.

**जरीच्या धंद्याची अडचण**— सुरत येथें जरीच्या धंद्याचें मोठे केंद्र आहे. जरीच्या धंद्याच्या व्यापारी संघटनांच्या अध्यक्षांनीं ह्या धंद्याला सोसाव्या लागणाऱ्या अडचणींची माहिती सांगतांना असें निवेदन केलें कीं धंद्यासाठी लागणाऱ्या तांब्याची व सोन्याची टंचाई झाली असल्याभुळें फार बिकट परिस्थिति निर्माण झाली आहे. धंद्याला लागणाऱ्या तांब्यापैकी फक्त १० टक्केच तांबें मिळत आहे. सोन्याच्या बाबतींत तर ५० टक्के कमी पुरवठा होत आहे. धंद्यासाठी लागणाऱ्या सोन्याच्या ७५ टक्के सोनें तरी मिळणें अतिशय अवश्य आहे.

**जपानी मंत्र्यांची सूचना**—जपानच्या व्यापार मंत्र्यांनीं असें सुचविलें आहे कीं आशियांतील देशांच्या शेतीचा विकास करण्यासाठी २० कोटी डॉलर्सचा शेती निधि उभारण्यांत यावा. आशिआंतील समाजस्थिति सुस्थिर राहण्यासाठी तेथलि शेतीचा विकास अत्यंत आवश्यक आहे. म्हणून हा निधि उभारण्याच्या कामीं प्रगत देशांनीं पुढाकार घ्यावा आणि निधींतून आशियामधील देशांना कमी व्याजाच्या दरानें शेती सुधारणेसाठी कर्जें द्यावीं, असें त्यांचें म्हणणें आहे.


# Bankers Practical Training Course

14th Batch will start on Thursday, 15th July 1965. Admission to Bank-employees and persons desirous to enter into Bank Service.


**Duration :** 3 Months **Time :** 7-30 to 8-30 a. m.

Enquire at :

**The Deccan Institute of Commerce**

717 Budhwar Peth, Poona 2.

( Telephone No. 54960 )





हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें